# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in,Phone No.: 020-25621440


**परिपत्रक क्र. ०५ /२०२६**

**विषय : परिपत्रक १२५/२०११ अंतर्गत अंतर्भूत असलेल्या पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमांस शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्राच्या परीक्षा आयोजनाबाबत.**

संदर्भ : १) परिपत्रक क्र. २२९/२०२५, जा. क्र. परीक्षा-समन्वय/७२७, दिनांक ०४/०९/२०२५

२) परिपत्रक क्र. २३०/२०२५, परीक्षा-समन्वय/७२७, दिनांक ११/०९/२०२५

३) परिपत्रक क्र. २६४/२०२५, जा. क्र. परीक्षा-समन्वय/८१९, दिनांक ३०/१०/२०२५

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र. १२५/२०११ हे निराशित करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पर्यंत विविध विद्याशाखेतील अभ्यासक्रम निहाय परीक्षा महाविद्यालय स्तरावर होत आहेत. तसेच अनुशेषित विद्यार्थी (नव्याने प्रवेशित प्रथम सत्र वगळून) पुढील वर्षीच्या परीक्षा महाविद्यालया स्तरावर होतील. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्व परीक्षांचे टप्याटप्याने अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत परीक्षा विषयक वेळोवेळी विहित केलेले नियम, अटी व शर्ती यांच्या अधीन राहून विद्यापीठ स्तरावर आयोजन करण्यात येणार आहे. याबाबतची पुढील कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्वे, सूचना व कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील.

**विद्यापीठ स्तरावर करावयाची कामे पुढीलप्रमाणे -**

१. परीक्षा अर्ज भरणे.
२. परीक्षांचे पेपर सेटींग करणे व परीक्षा केंद्रांना प्रश्नपत्रिका QPD द्वारे पाठविणे.
३. परीक्षांचे वेळापत्रक तयार करणे.
४. हॉल तिकीट व समरी तयार करणे.
५. प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षांचे कालावधी निश्चित करणे.
६. अंतर्गत व बहिस्थ गुण भरण्यासाठी प्रणाली उपलब्ध करून देणे.
७. निकाल प्रक्रिया पूर्ण करणे.

Scanned with OKEN Scanner

**महाविद्यालय स्तरावर करावयाची कामे पुढीलप्रमाणे -**

१. परीक्षा अर्ज कायम करणे.

२. वेळापत्रकानूसार विद्यापीठाने जाहीर केलेले परीक्षांचे नियोजन करणे.

३. परीक्षांसाठी लागणारी सर्व प्रकारची स्टेशनरी महाविद्यालयांची वापरणे.

४. महाविद्यालात स्तरावर (CAP) केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प राबविणे.

५. अंतर्गत व बहिस्थ गुण दिलेल्या प्रणालीत भरणे.

६. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील प्रथम वर्षातील प्रथम सत्र अनुशेषित विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे.

(प्रा.डॉ.प्रभाकर देसाई)
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

परीक्षा समन्वय कक्ष, परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र. १७, दिनांक: ०५ .१.२०२६

**प्रति,**

**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था**

**पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, नाशिक जिल्हा व दादरा आणि नगर हवेली केंद्रशासित प्रदेश**

**प्रत माहितीसाठी:**

१) मा.प्रभारी अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग.
३) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग.
४) उपकुलसचिव, गोपनीय व बारकोड कक्ष, परीक्षा विभाग.
५) उपकुलसचिव, गोदाम कक्ष, परीक्षा विभाग.

Scanned with OKEN Scanner